कोर्ट विद्यमान श्रीमती प्रियदर्शनी बोरकर, तहसिलदार हिंगणा यांचे महसूल न्यायालय हिंगणा

रा.मा.क्र.२५ /एन.ए.पी.-३४/२०२१-२२
मौजा-वानाडोंगरी, प.ह.नं. ४६,
तालुका-हिंगणा, जि. नागपूर

(महाराष्ट्र जमिन महसूल संहीता १९६६ चे कलम ४२ अ मधील तरतूदीन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम/विकास परवानगी दिली आहे, अशा जमिनीच्या भोगवटदारास द्यावयाची सनद)

परिशिष्ट "ब"

(पारीत दिनांक **१९ एप्रिल २०२२**)

ज्याअर्थी अर्जदार श्री. दिलीप गणपत साखळे, व इतर रा. नागपूर यांनी मौजा-वानाडोंगरी, सा. क्र. ४६ येथील सर्व्हे क्र. ३८ आराजी १.६२ हे. आर या जमीनीवरील निवासी प्रयोजनार्थ अनधिकृत अभिन्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४७(ब) व महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारीत) अधिनियम २०२१ अन्वये छानणी शुल्क, प्रशमन शुल्क व विकास आकारचा भरणा करुन नियमानुकुल/ नियमितीकरण करणेबाबत मुख्याधिकारी, नगर परिषद, वानाडोंगरी (नियोजन प्राधिकरण) यांचेकडे अर्ज सादर केलेला आहे.

ज्याअर्थी मुख्याधिकारी, नगर परिषद, वानाडोंगरी (नियोजन प्राधिकरण) यांनी महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारीत) अधिनियम २०२१ चे कलम ५(१) अन्वये निवासी प्रयोजनार्थ अनधिकृत अभिन्यास/लेआऊट पत्र जा. क्र./न.प.वा./न.र.वि./भु.नियमी/१३७६ दिनांक १४/०३/२०२२ अन्वये नियमितीकरण करुन बांधकाम/विकास परवानगी दिली आहे.

ज्याअर्थी सदरहु नियमितीकरण पत्राची व नियमानुकुल/नियमितीकरण अभिन्यास नकाशाची प्रत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे सुधारीत कलम ४२ अ अन्वये "परिशिष्ट ब" मध्ये सनद निर्गमित करणेकरीता या कार्यालयात प्राप्त झालेली आहे.

ज्याअर्थी मुख्याधिकारी, नगर परिषद वानाडोंगरी यांनी नियमानुकुल/नियमितीकरण करुन मंजूर केलेला अभिन्यास नकाशा या सनदे सोबत संलग्न आहे. मंजूर अभिन्यासाच्या क्षेत्राचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

AREA STATEMENT			
१	AREA OF LAND AS PER ७/१२ RECORD	१६२००.००	SQ.MT
२	TOTAL AREA OF UNDER LAYOUT	१६२००.००	SQ.MT
३	AREA UNDER RECREATION OPEN SPACE	१६२२.३९	SQ.MT
४	AREA UNDER INTERNAL ROADS	४१०७.०३	SQ.MT
५	SPACE FOR ELECTRIC SUB-STATION & WASTE WATER TREATMENT & RECYCLING PLANT	६०.००	SQ.MT
६	AREA UNDER AMENITY SPACE	०.००	SQ.MT
७	TOTAL AREA UNDER PLOTS	१०४१०.५८	SQ.MT

आणि ज्याअर्थी उक्त जमीनीच्या भोगवटदाराने शासनाने, उक्त संहीतेच्या कलम ४७ अ नुसार देय रुपांतर कराची व नमुद निवासी अकृषिक प्रयोजनार्थ वांपरापोटी आकारणीची रक्कम पुढीलप्रमाणे निर्धारित करण्यात येते.

उपरोक्त प्रमाणे जागेचे एकुण क्षेत्रफळ १.६२ हे.आर (१६२०० चौ.मी.) निवासी प्रयोजनार्थ अकृषक सारा आकारणी करावयाचे क्षेत्र १६२०० चौ. मी. ला ०.१० पैसे प्रति चौ.मी. याप्रमाणे एकुण अकृषक महसुल कर रु. १४५८०/- परावर्तीत कर अकृषक साऱ्याच्या ५ पट म्हणजेच रु. ८१००/- असे एकुण रु. २२६८०/- चालान क्र. MH०००६४१०८३ दिनाक १८/०४/२०२२ रोजी शासन खजिना दाखल केलेली आहे.

त्याअर्थी आता, उक्त संहीतेमधील तरतुदीच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींना आणि खालील शर्तींना अधीन राहून उपरोक्त जमिनीच्या भोगवटदारास सदर नियोजन प्राधिकाऱ्याच्या वर उल्लेखीत अनधिकृत अभिन्यास नियमितीकरण/नियमानुकुल परवानगीच्या अनुषंगाने सदर जमिनीवर अनुज्ञेय करण्यात आलेला निवासी अकृषिक वापरापोटी उक्त सहिंतेच्या कलम ४२-अ अन्वये ही सनद देण्यात येत आहे.

१) आकारणी : उक्त जमिनीच्या भोगवटदारास उक्त जमिनीच्या संबंधात या अगोदर वसुली योग्य असलेल्या आकारणी ऐवजी वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासुन दिनांक ३१ जुलै, २०२२ रोजी संपणाऱ्या हमीच्या

कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी रुपये ०.१० प्रती चौ. मी. प्रमाणे रूपये १६२०/- या दराने परीगणित होणारी वार्षिक आकारणी देईल अशी उक्त कालावधी संपल्यानंतर उक्त संहिते अन्वये तहसिलदार कडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल. अशी सुधारीत आकारणी देईल.

२) उक्त जमिनीचा भोगवटदार उक्त जमिनीवर वसुली योग्य असलेले सर्व कर, दर आणि उपकर भरील.

३) वरीलप्रमाणे नियमानुकुल/नियमितीकरण करुन मंजूर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकारणाच्या पूर्व मंजूरी शिवाय कोणताही बदल करु नये व ही सनद निर्गमीत झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मान्यतेने सदर जमिनीच्या वापरामध्ये किंवा वापराचे क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती असा बदल नियोजन प्राधिकरण कडून मंजूर झाल्यापासून ३० दिवसाच्या आत तहसिलदार यांना देणे भोगवटदारावर बंधनकारक राहिल.

४) उक्त जमिनीच्या भोगवटदाराने पुर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास तहसिलदार यास, उक्त संहितेच्या अन्वये तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदी अन्वये जी भरण्यास उपयोग करता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम ३२९ च्या पोट कलम (२) च्या अधिनतेने, त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यावर उक्त जमिन भोगवटादार यांच्या वहिवाटीत असण्याचे चालू ठेवता येईल.

५) उक्त जमिनीच्या भोगवटदाराने उपअधिक्षक, भुमी अभिलेख, हिंगणा यांचे कडून मोजणी करून घेणे बंधनकारक राहिल त्यानंतरच सदर सनद प्रभावी होईल.त्यांची साक्ष म्हणुन तहसिलदार, हिंगणा या तहसिलदार अधिकाऱ्याने, महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने आपली सही केली आणि आपल्या पदाची मोहर लावली आहे. आणि अर्जदाराने सुध्दा यावर दिनांक १९/०४ /२०२२ रोजी आपली सही केली आहे.

(भोगवटदाराची स्वाक्षरी)

(श्री. रितेश राधेश्याम शर्मा)

(श्री. दिलीप गणपत साखळे)

(साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्या व पदनामे)

अ) श्री सचिन दि. सावरबे

ब) श्री अंकुडा वा भोंगरे

(साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्या व पदनामे)

अ) श्री सचिन दि. सावरबे

ब) श्री अंकुडा वा भोंगरे

आम्ही असे जाहिर करतो की, ज्याने सनदेवर स्वत: श्री. रितेश राधेश्याम शर्मा व श्री. दिलीप गणपत साखळे यांनी स्वाक्षरी केली, ती व्यक्ती आमच्या वैयक्तिक माहितीप्रमाणे ती जी व्यक्ती असल्याचे म्हणत आहे. ती अ व ब व्यक्ती, तीच व्यक्ती आहे आणि त्यांनी या ठिकाणी आमच्या समक्ष आपली स्वाक्षरी केलेली आहे .

(प्रियदर्शनी बोरकर)
तहसिलदार, हिंगणा

प्रतिलीपी : -

१) तलाठी सा . क्र . ४६ मौजा - वानाडोंगरी यांना उचित कार्यवाहीस अग्रेषित.

२) अर्जदार श्री. दिलीप गणपत साखळे व इतर, रा. नागपूर यांना माहितीस अग्रेषित.

तहसिलदार, हिंगणा

तहसिलदार, हिंगणा